# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
# पिंपरी ४११०१८

## माहिती व तंत्रज्ञान विभाग

## जाहिर प्रकटन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कोवीड केअर सेंटर, दवाखाने, रुग्णालये येथील कामकाजाकरीता ९० दिवस कालावधीसाठी, निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात रक्कम रुपये १९,२५०/- मासिक एकवट वेतनावर एकूण १०० उमेदवार "डाटा एन्ट्री ऑपरेटर" म्हणून नियुक्त करावयाचे आहेत. त्याकरीता किमान अर्हता खालीलप्रमाणे.

१) (अ) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा, कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा किंवा उच्च माध्यमिक /**HSC** परीक्षा उत्तीर्ण असावा (पदवीधर उमेदवार पुरेसे उपलब्ध झाले नाहीत, तरच केवळ उच्च माध्यमिक /**HSC** परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांचा विचार केला जाईल.

(आ) मान्यताप्राप्त **(GCG)** मराठी ३० आणि इंग्रजी ४० शप्रमि टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण असावा.

(इ) उमेदवार **MS-CIT** किंवा समकक्ष संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असावा.

२) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांच्या इंग्रजी टंकलेखन ४० शप्रमि या परीक्षा स्तरांनुसार उमेदवारास टंकलेखन चाचणी द्यावी लागेल.

३) उमेदवाराची निवड अर्हतेनुसार व गुणवत्तेनुसार करण्यात येईल. वय वर्षे १८ ते ४० वयोगटातील शारीरिकदृष्ट्या सक्षम उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

४) ऑनलाईन अर्ज दिनांक २५/०७/२०२० ते दिनांक ३१/०७/२०२० अखेर करता येतील. समक्ष अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

या नियुक्तीसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची लिंक, आवश्यक इतर अटी व शर्ती, सूचना, निवड पध्दत इ. माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिका **www.pcmcindia.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्दीस दिलेली आहे. त्याचे अवलोकन करून उमेदवारांनी अर्ज ऑनलाईन करावेत.

सही/-

(श्रावण हर्डीकर)

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८

जाहिरात क्र. ४१३